# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१८ – १९

**वाणिज्य विभाग**

प्रभात पुणे, शुक्रवार, दि. २ नोव्हेंबर २०१८

# विमाक्षेत्रात रोजगाराच्या संधी

## बहुतांश लोक वंचित : हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : देशातील बहुतांश जण विमासेवेपासून वंचित आहे. या पार्श्वभूमीवर जर विद्यार्थ्यांना त्यांच्या कर्तृत्व व कौशल्यावर मोठं होण्यासाठी विमाक्षेत्रात व्यवसायाची खूप संधी उपलब्ध असल्याचे प्रतिपादन विकास अधिकारी शांताराम शेलार यांनी केले. ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात वाणिज्य मंडळाच्या उद्घाटनप्रसंगी विमाक्षेत्रात नोकरीच्या संधी बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, डॉ. टी. जी. गिते, प्रा. गणेश धुमाळ, प्रा. पायल ओसवाल उपस्थित होते.

शेलार पुढे म्हणाले की, विमा व्यवसाय वेगाने विस्तारित होणारे क्षेत्र आहे. या व्यवसायात विविध पदावर नोकरीच्या भरपूर संधी आहे. १० वी किंवा १२वी उत्तीर्ण विद्यार्थी जिद्द, मेहनतीच्या बळावर यशस्वी विमा प्रतिनिधी होऊ शकतो. त्यांनी विपणन (मार्केटिंग), विक्री (सेल्स), सहायक प्रशासकीय अधिकारी (एएओ), विकास अधिकारी (डीओ), शाखा अधिकारी (ब्रँच मॅनेजर) याबद्दल माहिती सांगितली.

महाविद्यालय ही जीवन घडविणारी प्रयोगशाळा असून, विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांत सहभाग घेऊन आपले व्यक्तिमत्त्व घडवायला हवे, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य व विज्ञान मंडळप्रमुख डॉ. जरे यांनी, सूत्रसंचालन धनंजय वाटेकर या विद्यार्थ्याने तर आभार डॉ. गिते यांनी मानले.




मार्गदर्शन : हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात वाणिज्य मंडळाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना शांताराम शेलार.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख